Smt. P.D. Hinduja Trust's
K.P.B. HINDUJA COLLEGE OF COMMERCE
Sindhi Linguistic Minority Institution: (Autonomous)
(Affiliated to University of Mumbai) : NAAC Re-Accredited With "A+" Grade: CGPA: 3.59
Current Address (Temporary): Sadhana House, 570, Pandurang Budhkar Marg,
Behind Mahindra Towers, Worli, Mumbai – 400018. Contact Details Tel: 022-4098-9000.
Email: info@hindujacollege.Com : Website: www.hindujacollege.edu.in
Prin. Dr. Navin M. Punjabi Ref. No. :

Report on "Abhijat Marathi Bhasha Saptah' by Marathi Language Association, 1st October, 2026.

के. पी. बी. हिंदुजा कनिष्ठ महाविद्यालय, वरळी येथील मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने दिनांक ९ ऑक्टोबर २०२६ रोजी 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सुप्रसिद्ध कवयित्री प्रा. शीतल गाणार प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. 'मराठी भाषेसमोरील आव्हाने' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या श्रीमती स्मिता मेनन यांनी प्रमुख पाहुण्या प्रा. शीतल गाणार यांचे स्वागत केले. त्यानंतर प्रा. शीतल गाणार यांनी आपल्या व्याख्यानातून मराठी भाषेसमोरील सद्यस्थितीतील आव्हाने, भाषेचे बदलते स्वरूप, जागतिकीकरणाचा भाषेवर होणारा परिणाम आणि नव्या पिढीमध्ये मराठी भाषेविषयी अभिरुची निर्माण करण्याची आवश्यकता यांवर प्रकाश टाकला. मराठी भाषेचे समृद्ध साहित्यिक आणि सांस्कृतिक वैभव जपतानाच आधुनिक काळाशी सुसंगतपणे तिचा विकास करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच, केवळ मराठीच नव्हे, तर सर्व भाषांच्या अभ्यासाला समान महत्त्व देणे आवश्यक आहे. विविध भाषांचे ज्ञान आत्मसात करताना मातृभाषेचे महत्त्व जपले पाहिजे. सर्व भाषांचा आदर, भाषिक समन्वय आणि मराठी भाषेच्या संवर्धनातून मराठीचे भविष्य अधिक समृद्ध करण्याचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. या संवादामुळे विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व, तिच्यासमोरील आव्हाने आणि भाषेच्या संवर्धनातील आपली भूमिका यांविषयी अधिक जाणून घेण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाची सूत्रे मराठी विभागाच्या शिक्षिका ज्योती भारती यांनी सांभाळली.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी जागरूकता निर्माण होण्यास आणि भाषिक विविधतेचा आदर करण्याची भावना दृढ होण्यास मदत झाली. मराठी भाषेचे वैभव जपत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा प्रेरणादायी संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.